एका दशकाचे संगीतकार बंधू: हुस्नलाल-भगतराम

एका दशकाचे संगीतकार. पण त्या एक दशकात हुस्नलाल-भगतराम या भावांनी केलेली कामगिरी लक्षणीय होती. संगीतकार म्हणून चित्रपट संगीतक्षेत्रातलं त्यांचं योगदान विसरून चालणार नाही.

□ भगवतीकुमार शर्मा



१९४४ची गोष्ट. त्यावेळी माझं वय होतं अवघं १० वर्ष. एखाद् दुसऱ्या घरात रेडियो वाजू लागला होता. ग्रामोफोन मोडीत निघू लागले होते. आमच्याकडे दोन्हीपैकी काहीही नव्हतं. पण आमच्या घराच्या मागे एका घरात वाजणारा रेडियो ऐकू यायचा. एका रात्री कानावर एक गाणं आलं. त्याचे शब्द होते.

'दो दिलों को ये दुनिया मिटने ही नही देती
आशाओं की कलियाँ खिलने ही नही देती.'

गाण्याचे सरळ मधुर बोल मनात घर करून बसले. *चांद* चित्रपटातलं हे गीत मंजू नावाच्या गायिका-अभिनेत्रीने गायलं होतं. *चांद*चे संगीत दिग्दर्शक होते हुस्नलाल-भगतराम. आजही त्यांच्या गीतांची जादू मनावर आहे. पण त्या काळी या संगीतकार जोडीचं नाव त्यांच्या गीतांप्रमाणे प्रख्यात नव्हतं. मंजूनेच या संगीतकारांकडे गायलेलं *रतन* चित्रपटातलं 'अंगडाइ तेरी है बहाना...' हे गाणंही तेव्हा खूप गाजलं होतं.

१९४८मध्ये चित्रपट रसिकांच्या ओठांवर रेंगाळलेलं आणखी एक गीत 'एक दिल के तुकडे हजार हुए, कोई यहां गिरा कोइ वहां गिरा...' *होगी प्यार की जीत*मधलं हे गीत नायक रहेमानसाठी मोहम्मद रफीने सद्गदित कंठाने गायलं होतं. या गाण्याने कवी आणि

गायकाबरोबरच संगीतकारांनाही लोकप्रियता मिळवून दिली. हुस्नलाल आणि भगतराम यांचे पंडित अमरनाथ नावाचे मोठे बंधूही संगीतकारच होते. पण अधिक लोकप्रियता या संगीतकार जोडीला मिळाली. हिंदी चित्रपटातली संगीतकारांची ही पहिली जोडी. ही जोडी सक्रिय झाली तेव्हा गुलाम हैदर, खेमचंद प्रकाश, अनिल विश्वास, नौशाद, सी. रामचंद्र, सचिन देव बर्मन वगैरे दिग्गजांचा प्रभाव होता. तर शंकर-जयकिशन, ओ. पी. नय्यर यांचा उदय होऊ लागला होता. हुस्नलाल-भगतराम यांनी एक दशकभराच्या कालखंडातच काम केलं. पंजाबी लोकगीतं, वेगवान चाली आणि ठेका यामुळे त्यांचं संगीत लोकप्रिय झालं.

हुस्नलाल-भगतराम यांच्या मर्जीतले सूर: सुरैया, महंमद रफी आणि लता मंगेशकर

१९४४ साली हुस्नलाल-भगतराम यांच्या संगीत दिग्दर्शनाला सुरुवात झाली असली तरी त्यांचा अखेरचा चित्रपट १९६६ साली प्रदर्शित झाला. बावीस वर्षांच्या या कालखंडात ४९ प्रदर्शित चित्रपटांसाठी त्यांनी काम केलं. दोन चित्रपट अनसेन्सर्ड राहिले. पण तसा त्यांचा लोकप्रिय संगीताचा कालावधी १९४४ ते १९५४चाच होता. त्यानंतरच्या दशकात त्यांच्या संगीताचा फारसा प्रभाव नव्हता. पण या यशस्वी दशकात त्यांनी वैविध्यपूर्ण संगीत दिलं. कारण चित्रपट गीतांना लागणारी नावीन्यता त्यांच्याकडे अभावानेच होती. सुरुवातीला हिट ठरलेल्या आपल्याच संगीतात ते अडकून पडले. नव्या बंदिशी देऊ शकले नाहीत. अशाप्रकारे पुनरावृत्ती कोणत्या संगीतकारांना टाळता आली. पण पुनरावृत्तीतही कौशल्याने काहीतरी वेगळं देत असल्याचा आभास निर्माण करण्यात ते अयशस्वी ठरले. पुनरावृत्तीच्या अतिरेकापायी आपल्याच लोकप्रिय संगीताच्या चौकटीत अडकून पडले आणि निष्प्रभ ठरले.

या संगीतकार जोडीने आपल्या कारकीर्दीत महंमद रफी, लता मंगेशकर आणि सुरैया या तीन गायक-गायिकांवर भिस्त ठेवली. सुरुवातीला रफी-सुरैयाच्या जोडीला चमकावण्यात नौशाद इतकंच या दोघांचंही योगदान होतं. रफीने त्यांच्याकडे बत्तीस चित्रपटांसाठी पंचाण्णव गाणी गायली. बी. आर. चोप्राच्या *अफसाना*मध्ये मुकेशने गायलेल्या 'किस्मत बिगडी, दुनिया बदली...'सारख्या एखाद्या गीताला अपवाद म्हणता येईल. रफीकडून या जोडीने बरीचशी दर्दभरी गीतं गाऊन घेतली. *प्यार की जीत*मध्ये 'एक दिल के टुकडे...'पासून हा सिलसिला सुरू झाला. आणि नंतर *बडी बहन*मध्ये 'मोहब्बत के धोके में कोई न आये...', *आधी रात*मध्ये 'हमे दुनिया को दिल के जख्म...' आणि 'बहुत पूर दर्द है...', *गौना*मध्ये 'माँगी मोहब्बत पाई जुदाई...', *शगन*मध्ये 'दम तोडते है अरमा...', *शमा परवाना*मध्ये 'तुने मेरा प्यार न मिलाया...' वगैरे गीतांमधून महंमद रफी आणि हुस्नलाल-भगतराम यांनी चांगलाच रंग जमवला होता. त्याचवेळी उभ्या देशाला गौरवास्पद ठरलेलं 'सुनो सुनो ऐ दुनियावालो, बापूकी ये अमर कहानी...' हे गीत महंमद रफी, गीतकार राजेंद्रकृष्ण आणि संगीतकार जोडी हुस्नलाल-भगतराम यांच्या सहयोगाने अफाट लोकप्रिय झालं. थोडक्यात अनेक चित्रपटांतून रफी आणि हुस्नलाल-भगतराम हेच त्रिकूट जमलं.

या संगीतकार जोडीने रफी-लताकडून अनेक संस्मरणीय युगलगीतं गाऊन घेतली. द्वंद्वगीतात त्यांची प्रतिभा अधिक फुलत असे. गायिका म्हणून सुरैयाची सद्दी संपू लागली तसा लताचा सुवर्णकाळ आकारू लागला. *महल, अंदाज* आणि *बरसात*सारख्या चित्रपटातील गीतांमुळे लताची लोकप्रियता वाढू लागली होती. या संगीतकार जोडीने लताकडूनही अनेक संस्मरणीय गीतं गाऊन घेतली. *आसू*मधील 'सून मेरे साजना, देखो जी मुझको भूल न जाना...' हे पहाडी रागातील गाणं लताच्या सूरात छान सजलं. *मीनाबाजार*मध्ये लता-रफीचं 'दुपट्टा मेरा दे दे...'सारखं उडत्या चालीचं गीतही लोकांच्या ओठी होतं. मलिका पुखराजने 'अभी तो मैं जवान हूं...' ही अतिशय लोकप्रिय नज्म अनेक दशकांपूर्वी गायली होती. *अफसाना*मध्ये हाच मुखडा घेऊन वेगळ्या बंदिशीत हुस्नलाल-भगतरामने लताकडून ती गाऊन घेतली. इतकंच नाहीतर सिलोन रेडिओवर स्वतःच्याच 'आपके अनुरोधपर' या कार्यक्रमात सिग्नेचर ट्यून म्हणूनही त्याचा उपयोग केला. ही एक नोंद घेण्याजोगी घटना आहे. त्याचवेळी हुस्नलाल-भगतरामच्या संगीत दिग्दर्शनातला *बडी बहन* प्रदर्शित झाला. यात मुख्य नायिका-गायिका सुरैया होती. सहनायिका गीताबालीसाठी लताने पार्श्वगायन केलं. या चित्रपटातली 'चले जाना नही नैन मिल के...' किंवा 'चूप चूप खडे हो, जरूर कोई बात है...' लताबरोबर प्रेमलता नावाच्या एका गायिकेने गायलेलं हे गाणं पुढे

धम्माल उडवून गेलं. ही गाणी तुफान लोकप्रिय झाली होती.

हुस्नलाल-भगतराम आणि सुरैया यांचे व्यावसायिक संबंध अतिशय मधुर होते. *सनम* चित्रपटातील बारापैकी अकरा गाणी सुरैयाने गायली होती. या मैत्रीपूर्ण संबंधांची सुरुवात *प्यार की जीत*पासून झाली. ज्यातली 'तेरे नैनौने चोरी किया...' आणि 'ओ दूर जानेवाले, वादा न भूल जाना...'



ही दोन गाणी आजही कानावर पडतात. *बडी बहन*मध्ये सुरैया आणि हुस्नलाल-भगतराम हे कॉम्बिनेशन उत्कृष्ट ठरलं. 'वो पास रहे या दूर रहे, नजरों में समाये रहते है...', 'लिखने वालोंने लिखदी मेरी तकदीरमें बरबादी...' आणि 'बिगडी बनाने वाले बिगडी बना दे, नैया हमारी पार लगा दे...' ही तीनही गाणी लोकप्रिय ठरली. 'तुम मुझको भूल जाओ...' या गाण्याच्या अंतऱ्यात सुरैया जेव्हा 'शहनाईया बजेंगी और दुल्हनें सजेगी, हम देखते रहेंगे, रो रो के ये कहेंगे...' या ओळीतलं कारुण्य हृदयाला स्पर्श करून जातं.

आजच्या चित्रपटात रसिकांसाठी एक गोष्ट मुद्दाम सांगण्यासारखी आहे. सध्याचा लोकप्रिय अभिनेता गोविंदा याची आई निर्मलादेवीने हुस्नलाल-भगतरामसाठी *शमा-परवाना*त 'उल्फत के जाम पिला पिला...' हे गीत गायलं होतं. या जोडीचा एक चित्रपट *काफिला* १९५२मध्ये प्रदर्शित झाला होता. त्यातील 'लहरों से पूछ लो या किनारों से पूछ लो...' हे युगल गीत लता-किशोरकुमारच्या आवाजात लोकप्रिय ठरलं होतं. *राखी*, *काफिला*, *फर्माइश* आणि *अदले जहांगीर*मध्ये या जोडीने तलत मेहमूदकडूनही काही गीतं गाऊन घेतली.

शंकर-जयकिशनच्या जोडीतील शंकर एकेकाळी हुस्नलाल-भगतरामच्या वाद्यवृंदात काम करत होते. *बरसात*पासून शंकर-जयकिशनची जोडी जमली. *बरसात*मधील लताच्या आवाजातलं 'हवा में उडता जाए मोरा लाल दुपट्टा मलमलका...' आणि 'जिया बेकरार है, छाई बहार है...' या गाण्यातील अंतरामधल्या वाद्यसंगीतात हुस्नलाल-भगतरामची शैली स्पष्टपणे जाणवते.

१९५५ च्या दरम्यान या जोडीच्या संगीताचा प्रभाव ओसरू लागला. *कृष्ण सुदामा* आणि *टारझन अँड सर्कस*सारख्या चित्रपटांना संगीत देण्याची वेळ त्यांच्यावर आली. लक्ष्मीकांत-प्यारेलालच्या ऑर्केस्ट्रात नाइलाजास्तव काम पत्करावं लागलं. १९६८मध्ये हुस्नलालने तर १९७३मध्ये भगतरामने जगाचा निरोप घेतला. मोजक्याच काळात त्यांनी दिलेली गीतं अविस्मरणीय ठरली. साधारपणे प्रत्येक संगीतकाराचा एखादा मर्जीतला गीतकार असतो. त्यांचं ट्युनिंग चांगलं जमतं. शैलेंद्र-हसरत (शंकर-जयकिशन), शकील बदायुनी (नौशाद), राजेंद्र कृष्ण (सी. रामचंद्र), राजा महेंदी अली खाँ (मदन मोहन) अशा जोड्या ठरल्यासारख्या होत्या. ही परंपरा आजच्या गीतकार समीरपर्यंत चालली. पण हुस्नलाल-भगतरामना या बाबतीत अपवाद म्हणावं लागेल. या जोडीने एका दशकाच्या कारकीर्दीत चाळीस वेगवेगळ्या गीतकारांना संधी दिली होती. यावरून कोणत्याही गीतकारांवर हुस्नलाल-भगतराम या संगीतकार बंधूंची विशेष मर्जी नव्हती असा अर्थ होत नाही. कारण कमर जलालाबादी त्यांचे लाडके गीतकार होते. हुस्नलाल-भगतराम या जोडीसाठी त्यांनी बरंच गीतलेखन केलं. या संगीतकारांच्या सुमारे तेवीस चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केलं होतं. त्यांनी लिहिलेली अनेक गीतं आजही लोकप्रिय आहेत. तरीही आघाडीच्या पाच गीतकारात कमर जलालाबादी यांचं नाव कधीच घेतलं गेलं नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या संगीतकार जोडीने राजेंद्रकृष्ण, लरशार सैलानी, मजरूह सुलतान पुरी यांच्या गीतांनाही संगीत दिलं होतं.

चांदमुळे प्रकाशात आलेली हुस्नलाल-भगतराम ही जोडी *बडी बहन*मुळे यशाच्या कळसावर पोहोचली. पुनरावृत्तीचा मोह टाळला असता तर त्यांची कारकीर्द अधिक प्रदीर्घ ठरली असती. ●

> “हुस्नलाल-भगतराम या संगीतकार जोडीने आपल्या कारकीर्दीत महंमद रफी, लता मंगेशकर आणि सुरैया या तीन गायक-गायिकांवर भिस्त ठेवली. सुरुवातीला रफी-सुरैयाच्या जोडीला चमकावण्यात नौशाद इतकंच या दोघांचंही योगदान होतं. रफीने त्यांच्याकडे बत्तीस चित्रपटांसाठी पंचाण्णव गाणी गायली.”